361

क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/५२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५,
वांद्रे [पूर्व], मुंबई-४०० ०५१.

दिनांक : २८-५-१९९०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, १९९० रोजी झालेल्या बावन्नाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची पत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
२८/५/९०
[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,

सर्व सदस्य

निमंत्रित :

शासनाचे सचिव [१]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

No. BMRDA/MTG/52.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos. C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
'E' Block, Bandra(East),
Bombay-400 051.

Date : 28th May, 1990.

The minutes of the 52nd meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 31st March, 1990 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S. V. Asgaonkar
28-5-90
(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

INVITEE

The Secretary (I) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

-.-.-.-.-.-.-.-.-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
५२व्या सभेचे कार्यवृत्त

दिनांक : ३१ मार्च, १९९० [शनिवार]
वेळ : दुपारी १२-०० वाजता
सभास्थान: समिती कक्ष, ६वा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. सुशिलकुमार सं. शिंदे,<br>नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| प्रा. जावेद खान,<br>गृहनिर्माण मंत्री | – | सदस्य |
| श्री. अरुणलाल गो. गुजराथी<br>नगर विकास राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. रामदास नायक<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया,<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका. | – | सदस्य |
| श्रीमती इंदूमती त्रि. पटेल,<br>नगरसेविका,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्या |
| श्री. स. शं. तिनईकर,<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. सतिश त्रिपाठी,<br>शासनाचे सचिव,<br>नगर विकास विभाग | – | सदस्य |
| श्री. के. नलिनाक्षन<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | – | सदस्य |
| आणि | | |
| महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

निमंत्रित :

श्री. दि. कृ. जैन,
शासनाचे प्रधान सचिव,
नगर विकास विभाग

प्रारंभी अध्यक्षांनी गृहनिर्माण मंत्री प्रा. जावेद खान व नगर विकास राज्यमंत्री श्री. अरुणलाल गुजराथी यांचे प्राधिकरणाचे पदाधिष्ठित नवे सदस्य म्हणून हार्दिक स्वागत केले. मुंबई महानगर प्रदेशाच्या समस्यांची सखोल जाण व सार्वजनिक जीवनातील समृध्द अनुभव असलेले हे दोन्ही सदस्य प्राधिकरणाच्या विचारविमर्शात व निर्णयात मोलाची भर घालतील असा विश्वास अध्यक्षांनी व्यक्त केला.

तसेच माजी नगर विकास मंत्री डॉ. इसहाक जमखानवाला यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून, माजी गृहनिर्माण मंत्री डॉ. वा. रा. शेरेकर, माजी नगर विकास राज्यमंत्री श्री. बी. ए. देसाई, आमदार श्री. रमेश दुबे आणि माजी आमदार श्री. चंद्रशेखर प्रभू यांनी प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने बजावलेल्या बहुमोल सेवेची लेखी नोंद अध्यक्षांनी घेतली.

त्यानंतर अध्यक्षांनी माजी आमदार व दिनांक २४-१२-८० ते दिनांक १९-५-८३ पर्यंतच्या कालावधीतील प्राधिकरणाचे सदस्य श्री. तुकाराम ए. सुर्वे यांच्या निधनानिमित्त शोक व्यक्त केला. श्री. सुर्वे यांच्या निधनामुळे झालेली हानी व्यक्त करणारा एक ठराव दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून प्राधिकरणाने मंजूर केला [परिशिष्ठ]

त्यानंतर विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [५१व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

बॅक-बेमधील प्रस्तावित पुन:प्रापणाचा वर्सोवासारख्या इतर ठिकाणावर होणा-या पर्यावरण परिणामाविषयी, केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र, पुणे व राष्ट्रीय सागर विज्ञान संस्था, पणजी यांचा सल्ला घेण्याविषयीच्या सूचनेवर झालेल्या चर्चेच्या अखेरीस अध्यक्षांनी सांगितले की जर काही पुन:प्रापण करावयाचे अखेर ठरलेच असेल तर ते अधिक वेळ न गमावता हाती घेतले जावे याकरिता पुढील दोन गोष्टींचा एकदमच पाठपुरावा करण्यात यावा :

१] जनतेच्या हरकती व सूचना अजमावण्यासाठी प्रारुप विकास योजनांच्या प्रस्तावास प्रसिध्दी देणे व २] वर उल्लेखिलेल्या दोन संस्थांपैकी एकीचा सल्ला घेण्यात यावा.

ही सूचना प्राधिकरणाने मान्य केली. त्यानंतर कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

...३/-

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या बैठकीना सचिव/प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना सुध्दा कायम स्वरूपाचे निमंत्रित म्हणून बोलाविण्याचा प्रस्ताव

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४१२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण त्याला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १०अ खाली प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करून मूलत: प्राधिकरणाचे सदस्य नसलेल्या सचिव/प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना त्यांच्या बैठकीला कायम स्वरूपाचा निमंत्रित म्हणून प्रस्तावित केल्याप्रमाणे बोलाविण्यास संमती देत आहे."

बाब क्र. ३ : १९९०-९१ सालचे वार्षिक कार्य कार्यक्रम

हया बाबीवरील चर्चेच्या वेळी खालील सूचना करण्यात आल्या :-

१] भविष्यकाळात प्राधिकरणापुढे ठेवण्यासाठी वार्षिक कार्य कार्यक्रमाचा दस्त ऐवजाला अंतीम स्वरूप देताना, उपलब्ध साधनसामुग्रीचा इष्टतम उपयोग करण्यासाठी महानगरपालिका/नगर परिषदा वगैरे सारख्या संघटनांची मते अनौपचारिकरित्या अजमावली जावीत.

२] घाऊक बाजारपेठानी सोडलेल्या/सोडावयाच्या जागांचा वापर बदलण्याच्या निर्णयाला लवकर अंतीम स्वरूप देणे आणि सध्याच्या कायदे-कानूत सुधारणा/नवीन कायदेकानू करणे वगैरेसारख्या विविध विधिविषयक व्यवस्था जर करावयाच्या असतील तर त्याही लवकर करण्यात याव्यात.

३] वांद्रे-कुर्ला संकुलातील "आय" ब्लॉक मधील पक्षी अभयस्थानाकरिता राखून ठेवलेली जी जमिन शासनाने "स्वच्छ शहरांसाठी संस्था"ला भाडेपट्टीने दिलेली आहे, त्या जमिनीवर सतत होणा-या अनधिकृत अतिक्रमणाचा उल्लेख करुन असे सुचविण्यात आले की, शासकीय विभाग, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण इत्यादींच्या अखत्यारीतील जी जमीन सार्वजनिक कामा-साठी हवी असेल तिचे संरक्षण करण्यासाठी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने योग्य ती कारवाई करावी.

[कृ.मा.प.]

४] सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सुचविले की, मुंबई महानगर प्रदेशाच्या बाह्य क्षेत्रातील स्थानिक संस्थांच्या साधनसंपत्तीवर पडणारा ताण विचारात घेऊन मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने त्यांना त्या प्रदेशातील वेगवेगळया भू-पूर्वसंरचनेच्या विकास प्रकल्पांसाठी जादा निधी उपलब्ध करुन द्यावा. तथापी श्री. रामदास नायक यांनी ह्या संदर्भात बृहन्मुंबईतील व बाहेरील एकूण लोकसंख्येचाही विचार सामुग्री वितरणाच्या वेळी केला जावा असे नमूद केले.

प्राधिकरणाने नंतर १९९०-९१ च्या वार्षिक कार्य कार्यक्रमाला मान्यता दिली व खालील ठराव संमत केला;

ठराव क्र. ४१३ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, [अ] टिप्पणीसह सादर केलेल्या १९९०-९१ सालच्या वार्षिक कार्याचा कार्यक्रम व १९९०-९१ सालचा मुंबई नागरी विकास प्रकल्प फिरता निधी वार्षिक कार्य-कार्यक्रम संमत करण्यात येत आहे आणि [ब] वार्षिक कार्य-कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ४ : १९९०-९१ वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज

प्राधिकरणाने अर्थसंकल्पीय अंदाजाला मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला :

ठराव क्र. ४१४ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महानगर प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे १९९०-९१ सालचा अर्थसंकल्प आणि १९८९-९० सालचे सुधारीत अंदाज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम २३[१] खाली मंजूर करण्यात येत आहेत.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, राज्य शासनाकडून कलम १८[१][अ] अन्वये योजना अनुदानाबाबतीत प्रत्यक्ष जेवढी अनुदान रक्कम या प्राधिकरणाला मंजूर करण्यात येईल तेवढी रक्कम शासनाच्या मान्यतेमध्ये नमूद करण्यात आलेल्या शर्तीप्रमाणे त्या योजनांवर खर्च करण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु. १० लाखापेक्षा अधिक देय नसलेल्या बाबींना मंजूरी

...५/-

देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणांचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प फिरता निधीचे अंदाजीत जमा व खर्च दर्शविणारे १९९०-९१ चे अर्थसंकल्पीय अंदाज व १९८९-९० चे सुधारीत अंदाजास मंजूरी देण्यात येत आहे."

<u>बाब क्र. ५</u> : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८८-८९ या वार्षिक अहवाल</u>

प्राधिकरणाने वार्षिक अहवालाला मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला:

<u>ठराव क्र. ४१५</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९८८-८९ सालच्या वार्षिक अहवालाला हे प्राधिकरण मान्यता देत आहे. हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र. ६</u> : <u>विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी १९८८-८९ या कालावधीचा वार्षिक अहवाल</u>

ओशिवरे जिल्हा केंद्रासाठी राखून ठेवलेल्या जमिनीवर सतत होणाऱ्या अनधिकृत अतिक्रमणावर बरीच चर्चा झाली व अखेरीस असे ठरले की जागेची स्थिती व मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाला प्रकल्प कार्यान्वयनासाठी मोकळी जमीन उपलब्ध करुन देण्याची शक्यता अजमावण्यासाठी, **नगर** विकास मंत्री आणि अध्यक्ष मुं. म. प्र. वि. प्रा., गृहनिर्माण मंत्री आणि मुं. म. प्र. वि. प्राधिकरणाचे इतर सभासद मिळून संयुक्त पहाणी करावी.

त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक अहवालाला मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला :

<u>ठराव क्रमांक ४१६</u> :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, प्राधिकरण ओशिवरा जिल्हा केंद्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने

तयार केलेल्या १९८८-८९ च्या प्रारूप अहवालाला प्राधिकरण मान्यता देत आहे आणि हा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८८-८९ चा वार्षिक अहवाल

ह्या बाबीवरील चर्चेच्या वेळी वांद्रे-कुर्ला संकुलनाच्या "इ" भागातील मशिद/मदारसा म्हणून दावा केलेल्या दोन बांधकामांविषयी कोर्टाने दिलेल्या स्थगितीचा संदर्भ घेण्यात आला व ही स्थगिती काढून घेण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची चौकशी करण्यात आली.

त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक अहवालाला मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला:

ठराव क्रमांक ४१७ :

"असा ठराव संमत करण्यात येतो की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ नुसार वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १९८८-८९ या वर्षात केलेल्या कार्याचा अहवाल प्राधिकरण याद्वारे मान्य करीत आहे आणि सदर अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र.८ : बॅक-बे पुन:प्रापण योजनेकरिता [ब्लॉक तीन ते सहा] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून १९८८-८९ चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने वार्षिक अहवालास मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला :

ठराव क्रमांक ४१८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, बॅक-बे पुन:प्रापण योजनेतील ब्लॉक तीन ते सहाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९८८-८९ सालच्या प्रारूप अहवालास प्राधिकरण मान्यता देत आहे, आणि हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहे."

बाब क्र. ९ : कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८८-८९ या वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवालास मंजूरी दिली व खालील ठराव संमत केला. :

ठराव क्र. ४१९ :

"असा ठराव संमत करण्यात येतो की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ नुसार कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन १९८८-८९ या वर्षात केलेल्या कार्याचा अहवाल प्राधिकरण याद्वारे मान्य करीत आहे आणि मान्य करण्यात आलेला सदर अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. १० : वसई-विरार अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९८८-८९चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने वार्षिक अहवालाला मंजूरी दिली व पुढील ठराव संमत केला :

ठराव क्र. ४२० :

"असा ठराव करण्यात येतो की, वसई-विरार अधिसूचित क्षेत्राचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर करावयाच्या १९८८-८९ च्या वार्षिक अहवालाच्या मसूद्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे आणि हा अहवाल शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र. ११ : कल्याण विकास योजना - जागा क्र. ७२ व ७४ मध्ये किरकोळ फेरफार

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४२१ :

"ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कल्याण समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून राज्य शासनाने महाराष्ट्र

प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०[१][क] खाली शासकीय अधिसूचना क्र. टीपीबी/१२७५/११९१/युडी-८, दिनांक १५ मार्च १९७६ अन्वये नियुक्ती केली आहे.

"आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ११३[८] च्या तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य पार पाडणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास बंधनकारक आहे.

"आणि ज्याअर्थी, विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अखत्यारीत पूर्वीच्या कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ व हल्लीच्या उल्हासनगर या नगरपालिकांच्या क्षेत्राचा समावेश होतो.

"आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने आपल्या निर्णय क्र. टीपीबी/१२७९/३२३५[ए]/युडी-५, दिनांक १६ जानेवारी, १९८० अन्वये विकास योजना, कल्याण मंजूर केली आहे.

"आणि ज्याअर्थी, मंजूर विकास योजनेत, आरक्षण क्र. ७२ मधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामासाठी बाजार समितीच्या विनंतीवरून तसेच आरक्षण क्र. ७४ ही गुरांच्या बाजारासाठी बाजार समितीच्या विनंतीवरून राखून ठेवण्यात आली आहे :

"आणि ज्याअर्थी, कृषी उत्पन्न बाजार समितीने अशी इच्छा व्यक्त केली आहे की, १९८६ चा अनु.क्र. ९३५, दिनांक १२-२-१९८६, १९८७ चा अनु.क्र. २२२२, दिनांक २१-४-१९८७ व १९८७ चा अनु क्र. ३०११, दिनांक १९-६-१९८७ च्या रिट अर्जावरील निकालाप्रमाणे संबंधित पक्षांमध्ये झालेल्या सहमती तत्वांच्या आधारावरील तडजोडीनुसार आरक्षण क्र. ७४ या गुरांच्या बाजारासाठी राखीव ठेवलेल्या जागेमधून १.३७ हे. एवढया क्षेत्राची जागा वगळण्यात यावी आणि आरक्षण क्र. ७४ सह जागा आरक्षण क्र. ७२ चे क्षेत्र एकत्रिकरण करण्यात यावे व त्यासाठी आरक्षण क्र. ७४ सह आरक्षण क्र. ७२ च्या उर्वरित क्षेत्राचे एकत्रिकरण व जागा क्र. ७२ व ७४ चे विभाजन करणा-या ४० फूट रूंदीच्या विकास योजनेतील रस्त्यांचे स्थानांतर करण्यात यावे, अशीही इच्छा कृषी उत्पन्न बाजार समितीने व्यक्त केली आहे.

"आणि म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३[८] खालील अधिकारांचा वापर करून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आरक्षण क्र. ७२ व आरक्षण क्र. ७४ चा संबंधात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ नुसार मंजूर झालेल्या कल्याण विकास योजनेत किरकोळ फेरफार करण्याचा ठराव करीत आहे आणि तसेच परिशिष्ट "अ" म्हणून जोडलेल्या आराखडयाच्या प्रतीत ए, बी, सी, डी, इ या अक्षरांनी

आरक्षण क्र. ७४ मधील दर्शविलेल्या जमिनीचा भाग वगळण्याचा ठराव करीत आहे आणि आराखडयाच्या प्रतीवर पी, क्यू, आर, एस या अक्षरांनी दर्शविलेला ४० फूट रूंदीचा विकास योजना रस्ता, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पूर्वी सीमेसह स्थानांतरीत करण्याचा ठराव करीत आहे.

"आणि असाही ठराव करण्यात येतो की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ खाली प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा व याबाबतीतील इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात व दोन पेक्षा कमी नाही इतक्या वर्तमानपत्रातून, वरील प्रस्तावित फेरबदलाबद्दल अधिसूचनेचा प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीत, जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याच्या अधिसूचनेस प्राधिकरण मान्यता देत आहे,

"आणि असाही ठराव करण्यात येतो की, उक्त अधिनियमाच्या कलम १३९,तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७अ मधील शक्तींचा वापर करून, ही अधिसूचना प्रसिध्द करण्याचे अधिकार प्राधिकरण, महानगर आयुक्तांना देत आहे, आणि

"असाही ठराव करण्यात येतो की, उक्त अधिनियमाच्या कलम १५१ [३] खालील शक्तींचा वापर करून प्राधिकरण असा आदेश देते की, महानगर आयुक्त किंवा वरिष्ठ नियोजनकारापेक्षा कनिष्ठ नसलेला व महानगर आयुक्तांनी नियुक्त केलेला अधिकारी, या संबंधात येणा-या हरकती/सूचनांचा वा हरकती वा सूचना सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेऊन विचार करील आणि त्यानंतर आपला अहवाल प्राधिकरणाला सादर करील."

बाब क्र. १२ : मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोली याना १० लाख रूपयांचे लघु-मुदतीचे कर्ज देणे

कार्यकारी समितीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोलीला दिलेल्या १० लाख रूपयांच्या लघु-मुदतीच्या कर्जविषयीच्या कार्यवाहीवृत्तांची नोंद प्राधिकरणाने घेतली.

बाब क्र. १३ : कलम २१अ खालील प्राधिकरणाचे अधिकार कार्यकारी समितीला प्रदान करणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४२२ :

"असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४६ क तसेच कलम ७(३) (सात) खालील अधिकारांचा वापर करून, "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई नागरी विकास प्रकल्प संक्रमण निधी, विनियम १९८९" नुसार महानगर प्रदेशाच्या क्षेत्रातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला वा अन्य प्राधिकरणाला अनुदान आगाऊ रकमा किंवा कर्ज देणे वा त्यांच्या खर्चातील भाग देणे याबाबतचे अधिनियमातील कलम २१अ खालील अधिकार प्राधिकरण प्रस्तावित केल्याप्रमाणे याद्वारे कार्यकारी समितीला प्रत्यायुक्त करीत आहे."

त्यानंतर खालील बाब "पटल बाब" म्हणून अध्यक्षांच्या अनुमतीने प्राधिकरणापुढे ठेवण्यात आली.

पटल बाब : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४२३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ११च्या उपकलम २ आणि कलम ५० खाली दिलेल्या अधिकारामुळे तयार केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवा शर्ती) विनियम १९७७ च्या विनियम ३ अन्वये दिलेल्या प्राधिकाराचा वापर करून बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेली वेतनश्रेणी प्राधिकरण मान्य करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की,--

(अ) सुधारीत वेतनश्रेणीची अंमलबजावणी दि. १ जानेवारी, १९८६ पासून होईल. शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. आरपीएस-१२८८/१५४/एसईआर-१०, दि. १ ऑक्टोबर, १९८८ अन्वये सुधारीत केलेल्या वेतनाची दि. ०१-०१-८६ पासूनची थकबाकी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना रोखीत देण्यात यावी. वेतननिश्चिती आणि अनुषंगिक बाबीविषयीची कार्यवाही, रोख स्वरूपात देण्यात यावयाची थकबाकी वगळून, या संदर्भात निर्गमित झालेल्या शासकीय आदेशानुसार करण्यात यावी.

(ब) वेतनश्रेणी सुधारण्याच्या नियमातील तरतुदींचा शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. आरपीएस-१२८८/१५४/एसईआर-१०, दि. १ ऑक्टोबर, १९८८ अन्वये करण्यात येणाऱ्या कार्यवाहीमुळे एखाद्या विशिष्ट प्रकरणी गैरवाजवी त्रास होणार असेल तर महानगर आयुक्त, मुख्य लेखाधिकारी व विधी सल्लागार यांचा समावेश असलेल्या समितीला याद्वारे

अशे प्रकरण न्याय व समदृष्टीने हाताळण्यास आवश्यक वाटेल, एवढया मर्यादेपर्यंत व अशा शर्तींच्या अधीन राहून एखादा नियम बाजूला ठेवण्याचे किंवा शिथिल करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत. नियमातील तरतूदीच्या स्पष्टीकरणाबाबत एखादा प्रश्न उद्‌भवल्यास समितीचा निर्णय निर्णायक व अंतिम राहील."

मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष या नात्याने श्री. रामदास नायक, हजर रहाण्याची ही कदाचित अखेरची बैठक असेल असे विचार अध्यक्षांनी हयावेळी व्यक्त केले. त्यानंतर श्री. रामदास नायक यांनी प्राधिकरणाचे सभासद म्हणून केलेली मौल्यवान सेवा त्यांनी अभिलिखित केली.

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----जोडपत्र
------

जोडपत्र

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
५२वी बैठक

दिनांक ३१-३-१९९० [शनिवार]

: ठ रा व :

"श्री. तुकाराम एकनाथ सुर्वे, माजी आमदार, जिल्हा रायगड यांचे दिनांक ३० ऑक्टोबर, १९८९ रोजी निधन झाले. श्री. सुर्वे हे दिनांक २४-१२-१९८० ते दिनांक १९-५-१९८३ या कालावधीत प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री. सुर्वे यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण त्यांच्या दु:खद आणि आकस्मित निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे."

-------

MINUTES OF THE 52ND MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 31st March, 1990 (Saturday)

TIME : 12.00 Noon

PLACE : Committee Room, 6th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar S. Shinde, Minister for Urban Development | - Chairman |
| Prof.Javed Khan, Minister for Housing | - Member |
| Shri Arunlal G. Gujarathi, Minister of State for Urban Development | - Member |
| Shri Ramdas Nayak, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation | - Member |
| Shri Satish Tripathi, Secretary to Government, Urban Development Department | - Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, CIDCO, Bombay | - Member |
| & | |
| Metropolitan Commissioner | - Member-Secretary |

INVITEE :

Shri D.K. Jain, Principal Secretary to Government of Maharashtra, Urban Development Department

At the outset, the Chairman cordially welcomed Prof. Javed Khan, Minister for Housing and Shri Arunlal Gujarathi, Minister of State for Urban Development who were inducted as new members

of...2/-

of the Authority. The Chairman expressed confidence that with their deep knowledge of the problems of the Bombay Metropolitan Region and rich experience in public life, they would make a valuable contribution to the deliberations and decisions of the Authority.

The Chairman also placed on record the valuable services rendered by Dr. Ishaq Jamkhanwala, ex-Minister for Urban Development as the Chairman of the Authority; Dr. W.R. Sherekar, ex-Minister for Housing; Shri B.A. Desai, ex-Minister of State for Urban Development; Shri Ramesh Dube, MLA; and Shri Chandrashekhar Prabhu, ex-MLA as the members of the Authority.

The Chairman then condoled the sad demise of Shri Tukaram E. Surve, ex-MLA who was member of the Authority during the period from 24-12-1980 to 19-5-1983. The Authority next passed the resolution placing on record its deep sense of loss at the passing away of Shri Surve (Annexure).

The items on the Agenda were then taken up for consideration.

Item No.1 : Confirmation of the minutes of the last (51st) Meeting of the Authority.

While concluding the discussion on the suggestion (page 8 of the minutes) to consult the Central Water and Power Research Station (CWPRS), Pune, or the National Institute of Oceanography (NIO), Panaji as regards the ecological effect of proposed reclamation in BBRS on other places such as Versova, etc. the Chairman stated that two activities viz. (1) publication of draft development plan proposals for eliciting objections and suggestions from the public and (2) consulting one of the institutions mentioned above should be pursued simultaneously so that reclamation, if any, finally agreed could be undertaken without further loss of time. The suggestion was approved by the Authority.

The minutes were then confirmed.

Item No.2....3/-

Item No.2 : Proposal to invite additionally the Secretary/the Principal Secretary, Urban Development Department as permanent invitee to the Meetings of the Authority.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.412 :

"Resolved that in exercise of the powers conferred under Section 10A of the BMRDA Act, 1974, the Authority hereby do approve to invite the Secretary/the Principal Secretary, Urban Development Department who is not a member of the Authority to attend its meetings as a permanent invitee, as proposed."

Item No.3 : Annual Works Programme for the year 1990-91.

During the course of discussion on this Item, the following suggestions were made :-

(1) In future while finalising the Annual Works Programme document for being placed before the Authority, views of various other bodies such as Municipal Corporations/Municipal Councils, etc. concerned should be informally ascertained so as to deploy the available resources to most optimum use.

(2) Decisions as to the change of users of the areas vacated/to be vacated by various wholesale markets should be finalised early and various institutional arrangements including amending existing legislation/making new legislation, if any, be also made in good time.

(3) Reference was made to continuous unauthorised encroachments on land reserved for Bird Sanctuary in 'I' Block of Bandra-Kurla Complex which has been leased out by Govt. to Societies for Clean Cities and it was suggested that BMRDA as the Special Planning Authority should take necessary action to protect the lands vested in Government departments, MHADA, etc. which are required for public purposes.

(4) The Secretary, UDD suggested that taking into

consideration the resource constraints of local bodies in outer areas of BMR, the BMRDA should make available more funds for various projects of infrastructural development in that area. However, it was mentioned by Shri Ramdas Nayak that the total population in Greater Bombay and the outer area may also be taken into consideration while distributing resources.

The Authority then approved the Annual Works Programme for the year 1990-91 and passed the following Resolution :

RESOLUTION NO.413 :

"Resolved that (a) the Annual Works Programme for the year 1990-91 along with Annual Works Programme for the year 1990-91 of "Revolving Fund-BUDP" presented with this note be approved and (b) the Executive Committee be and is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme."

Item No.4 : Annual Budget Estimates for the year 1990-91.

The Authority approved the Budget Estimates and passed the following Resolution :

RESOLUTION NO.414 :

"Resolved that the Annual Budget Estimates for the year 1990-91 and the Revised Estimates for the year 1989-90 showing the estimated receipts and expenditure of the Metropolitan Authority be approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

"Resolved further that the Authority do hereby authorise the Metropolitan Commissioner to incur expenditure in respect of plan grants to be received from the State Government under Section 18(1)(a) of the BMRDA Act, 1974 to the extent of amount released by the State Government as approved and subject to the conditions attached in the sanction of the Government.

"Resolved further that the Authority do hereby authorise the Executive Committee to sanction schemes/surveys, etc., not included in the Works Programme, estimated to

cost..5/-

cost not more than Rs.10 lakhs in each case and to authorise incurring of any expenditure not exceeding the same limit in respect of which provision has not been made in the approved budget, subject to report of such cases being made to the Authority in the next meeting.

"Resolved further that the Authority do hereby approve the Annual Budget for the year 1990-91 and Revised Estimates for the year 1989-90 showing the estimated receipts and the expenditure of the 'Revolving Fund-BUDP'."

Item No.5 : Annual Report of the BMRDA for 1988-89.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.415 :

"Resolved that the Authority do approve the draft Annual Report of the BMRDA for 1988-89 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.6 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre Area for 1988-89.

There was considerable discussion about continuous unauthorised encroachments on lands reserved for the Oshiware District Centre at the end of which it was agreed to have joint inspection of site by Minister (UD) & Chairman, BMRDA; Minister (Housing) and other members of BMRDA to see the conditions at site including the possibility of making available open land to BMRDA to start the implementation of the project.

The Authority then approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.416 :

"Resolved that the Authority do hereby approve the draft report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre, for the year 1988-89, and

authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.7 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1988-89.

During the course of discussion on this Item, a reference was made to the stay granted by Court to 2 structures in 'E' Block of Bandra-Kurla Complex claimed as Mosque/Madarsa and enquiries were made as to the steps taken to get the stay vacated.

The Authority then approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.417 :

"Resolved that the Authority do hereby approve the draft Annual Report for the year 1988-89 of the BMRDA as the Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.8 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme (Blocks III to VI) for the year 1988-89.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.418 :

"Resolved that the Authority do hereby approve the draft Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme, for the year 1988-89 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.9 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1988-89.

The Authority approved the Annual Report and

passed the following Resolution :

RESOLUTION NO.419 :

"Resolved that the Authority do hereby approve the draft Annual Report for the year 1988-89 of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.10 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for the Vasai-Virar Notified Area for the year 1988-89.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.420 :

"Resolved that the Authority do hereby approve the draft Annual Report for the year 1988-89 of the BMRDA as the Special Planning Authority for Vasai-Virar Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966 and authorise the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

Item No.11 : Development Plan Kalyan Minor Modification to .. Site Nos. 72 & 74.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.421 :

"Whereas BMRDA is appointed as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area as per Government Resolution No.TPB/1275/1191/UD-8, dated 15th March, 1976 under the provisions of Section 40(1)(c) of MR&TP Act, 1966 (hereinafter referred to as the said Act);

"And whereas it is obligatory on BMRDA to perform all functions of planning authority under the provisions of Section 113(8) of MR&TP Act, 1966;

"And...8/-

"And whereas, areas of the erstwhile Municipal Councils for Kalyan, Dombivali, Ambernath and Ulhasnagar municipal limits are included in the jurisdiction of Special Planning Authority;

"And whereas, the Government of Maharashtra by its Resolution No.TPB/1279/3235(A)/UD-5, dated 16th January, 1980 has sanctioned Development Plan, Kalyan;

"And whereas, in the sanctioned Development Plan site No.72 is reserved for APMC purposes at the request of APMC, and site No.74 is reserved for cattle bazar purposes at the request of APMC;

"And whereas, APMC Kalyan desires to delete land admeasuring 1.37 ha. out of reservation No.74 for cattle bazar in terms of compromise arrived at on the basis of consent terms between the concerned parties in Writ Petitions No.935 of 1986, dated 22.2.1986, No.2222 of 1987, dated 21.4.1987, and No.3011 of 1987, dated 19.6.87 and further desires to amalgamate balance of the area from site No.74 with site No.72 by relocating 40' wide Development Plan road separating Site No.72 and 74 along the eastern boundary of the APMC reservation;

"Now therefore, in exercise of the powers contained in Section 113(8) of MR&TP Act, 1966, the Authority do resolve to initiate minor modification to the sanctioned Development Plan of Kalyan as provided in Section 37 of the MR&TP Act, 1966 in respect of Site No.72 and 74, and further resolve to delete portion of land comprised in Site No.74 marked A B C D E on the copy of the plan appended as Annexure 'A' to the Item Note and further resolve to relocate 40' wide D.P. Road along the eastern boundary of APMC reservation, marked P Q R S on the said plan and washed pink.

"Resolved further that in **exercise** of powers under Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf the Authority approve of a notice being published in the Maharashtra Government Gazette, and in not less than 2 newspapers inviting objections and suggestions from the public for the

said...9/-

said proposed modification not later than one month from the date of such notice;

"Resolved further that in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7A of BMRDA Act, 1974 the Authority do authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses; and

"Resolved further that in exercise of its powers under Section 151(3) of the said Act the Authority do direct that the Metropolitan Commissioner or officer not below the rank of Senior Planner appointed by him, shall consider the objections/suggestions which will be received in this behalf, after giving hearing to persons presenting such objections/ suggestions and shall submit his report to the Authority."

Item No.12 : Grant of short-term loan of Rs.10 lakhs to the Bombay Metropolitan Region Iron & Steel Market Committee, Kalamboli.

The Authority noted the reported action as regards grant of short-term loan of Rs.10 lakhs to the Bombay Metropolitan Region Iron & Steel Market Committee, Kalamboli, by the Executive Committee.

Item No.13 : Delegation of powers of the Authority under Section 21A of the BMRDA Act to the Executive Committee.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.422 :

"Resolved that in exercise of its powers under Section 46C read with Section 7(3)(vii) of the BMRDA Act, 1974, the Authority do hereby delegate the powers under Section 21A of the Act to the Executive Committee to give grants, advances or loans or to share expenses with any local authority or other authority in the Metropolitan Region in accordance with BMRDA Bombay Urban Development Project - Revolving Fund Regulations, 1988, as proposed."

The...10/-

The following item was then placed before the Authority as a Table Item, with the permission of the Chair :

Table Item : Revision of pay-scales of BMRDA employees.

The Authority approved the proposals contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.423 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and Regulation 3 of the Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service) Regulations, 1977, framed by it under the powers conferred on it under Section 50 of the said Act, the Authority do approve the revision of scales of pay as shown in column 3 of Annexure-I to the item note, in respect of posts shown in column 2 thereof.

"RESOLVED FURTHER THAT -

(a) the revision of scales of pay shall be effective from the 1st January, 1986. The arrears in respect of pay revised under Government Notification F.D. No.RPS-1288/154/SER-10, dated 1st October, 1988, shall be payable to the employees of BMRDA in cash, with effect from 1st January, 1986. The action regarding fixation of pay and other incidental matters except regarding payment of arrears in cash, shall be taken as provided in the Government orders issued in this regard;

(b) where the operation of all or any of the provisions of the rules governing the revision of pay-scales under Government Notification F.D. No.RPS-1288/154/SER-10, dated 1st October, 1988 causes undue hardship in any particular case, a Committee consisting of the Metropolitan Commissioner, Chief Accounts Officer and Legal Adviser is hereby

empowered...11/-

empowered to dispense with or relax the requirements of that rule to such extent and subject to such conditions as it may consider necessary for dealing with the case in a just and equitable manner. If any question arises relating to the interpretation of any of the provisions of the rule, the decision of the Committee shall be conclusive and final."

At this stage, the Chairman observed that it was perhaps the last Meeting when Shri Ramdas Nayak was attending the Meeting of the Authority in his capacity as the Chairman, Standing Committee, BMC. He then placed on record valuable services rendered by Shri Ramdas Nayak as a member of the Authority.

Meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

- - - - - -

Annexure.

ANNEXURE

52ND MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 31-3-1990 (Saturday)

RESOLUTION :

"Shri Tukaram Eknath Surve, ex-M.L.A. from Raigad District has passed away on 30th October, 1989. Shri Surve was member of the Authority during the period from 24-12-1980 to 19-5-1983. During this period, he evinced keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its deep sense of loss and sorrow at his sad and sudden demise."

- - - - - - -